# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र.७९१/२०२२/छत्रपती संभाजीनगर**

श्री.राजाभाऊ ज्ञानोबा पवार,घ.नं.६५१
मुर्तीजापूर,जि.छत्रपती संभाजीनगर : तक्रारदार

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा महावितरण म्हाडा कॉलनी ,मुर्तीजापूर,जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

२. कार्यकारी अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी,महावितरण म्हाडा कॉलनी छत्रपती संभाजीनगर

**निर्णय**

**(सुनावणी दि. ०८.११.२०२३)**

तक्रारदार यांनी दि.०६.०७.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपील अर्ज केल्यानतंर तक्रार थेट पुढीलप्रमाणे दाखल केली आहे. "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.मी दि.११.०४.२०२२ रोजी महावितरण म्हाडा कॉलनी मुर्तिजपूर,छत्रपती संभाजीनगर येथ माहितीचा अर्ज केला होता. त्याचा विषय :- विदयुत वितरणाच्या बिलामध्ये दाखविलेले वेगवेगळे विषय स्थिर कर आकार,वित आकार,वहन आकार,इंधन समायोजन आकार,विज शुल्क,इत्यादी कर व त्याची माहिती बिलिंग युनिटचे दर त्यासंदर्भातील शासन आदेश व आपल्या कार्यालयाची नियमावली सदर बिलामध्ये आकारलेली कराची रक्कम ज्या नियमाद्वारे आकारली जाते त्या नियमाचे किंवा आदेशाची प्रत देण्यात यावी. सदर माहिती मेलद्वारे किंवा पोस्टाद्वारे वरील पत्यावर माहिती अधिकाराच्या लोगोसहीत साक्षांकित करुन देण्याची विंनती केली होती.परंतु त्यांनी मला दि.१० मे २०२२ रोजी ईमेल वरती इंग्रजी स्वरुपातील माहिती दिली आहे.ती मला समजत नाही त्यामुळे दिशाभूल करणारी माहिती आहे.

वरील माहिती माहिती अधिकाराच्या लोगोसहीत साक्षांकित करुन दिलेली नाही व पोस्टाने माहिती पाठविलेली नाही. अपीलीय अधिकारी यांचे नाव पत्ता त्यांचा हुद्दा इत्यादी सर्व माहिती देणे अपेक्षित होते परंतु दिलेली नाही. त्यामुळे मला त्या माहितीचा काहीही उपयोग झालेला नाही.त्यामुळे योग्य माहिती मिळण्याठी मी प्रथम अपील दि.२०.०६.२०२२ रोजी श्री.महेश दौलतराव पाटीय अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दाखल केले आहे.मी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ नुसार तक्रार दाखल करित आहे. त्या अधिका-याची या प्रकरणावर ती सखोल चौकशी होऊन त्यांच्या कारवाई करण्यासाठी."

आज दि.०८.११.२०२३ रोजी सदर तक्रारीची सुनावणी ठेवण्यात आली, सुनावणीच्यावेळी श्री.शरद भास्करराव ढाकणे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता विमानतळ शाखा कार्यालय छत्रपती संभाजीनगर,श्री.प्रकाश रामकृष्ण तौर,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अति.कार्यकारी अभियंता,उपविभाग,महावितरण चिकलठाणा उपविभाग क्र.२ श्री.महेश दौलतराव पाटील,प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता

महावितरण शहर विभाग क्र.१ विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर व तक्रारदार हे सुनावणीसाठी उपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान श्री.महेश दौलतराव पाटील, प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता महावितरण शहर विभाग क्र.१विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी सुचित केले की,सदरील माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यांनी तो माहिती अर्ज श्री.प्रकाश रामकृष्ण तौर,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अति.कार्यकारी अभियंता,उपविभाग,महावितरण चिकलठाणा यांच्याकडे हस्तांतर केला. त्यांनी सूचित केले की, सदरील माहिती त्यांचाकडे उपलब्ध नसल्यामुळे महावितरण कंपनीचे मुख्यालय प्रकाशगड मुंबई यांची कडून ईमेलद्वारे प्राप्त करुन घेतली व ती अर्जदार यांच्या ईमेलद्वारे पाठविली.

तक्रारदार यांनी सूचित केले की, महावितरण कंपनीकडे माहिती अर्ज केला त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ईमेल द्वारे इंग्रजीमध्ये माहिती दिली त्यामुळे ती माहिती माझ्या कामाची नाही, मला समजून येत नाही. तसेच मराठी राज्यभाषाच्या नियमाच्या (महाराष्ट्र राज्यभाषा अधिनियम१९६४ आणि तद्दनतंरचे शासनाचे विविध परिपत्रके )यांची अंमलबजावणी उत्तरवादी यांनी केलेली नाही. त्यामुळे सदरील माहिती मला मराठी भाषेमध्ये उपलब्ध करुन दयावी असे माझे म्हणणे आहे, इंग्रजीमध्ये मला पुरविलेली माहिती सध्या माझ्या ईमेलवर उपलब्ध नाही त्याचा पुरावा मी देऊ शकत नाही.

आयोगाच्या पटलावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व प्रत्यक्ष सुनावणीमध्ये उभयपक्षानी प्रस्तुत केलेला युक्तीवाद विचारात घेता,कलम २(च) नुसार ज्या स्वरुपात माहिती संबंधित कार्यालयाच्या अभिलेखांमध्ये उपलब्ध असेल त्यास्वरुपात माहिती देय होते, आणि तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार मराठी राज्यभाषेच्या नियमांची तथा परिपत्रकांची अंमलबजावणी संबंधित प्राधिकरणांनी करावी याकरिता तक्रार योग्य त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे दाद मागू शकतात. त्याकरिता कलम १८नुसार अधिनियममध्ये कोणतीही तरतुद नाही. कलम १८ नुसार शास्तीची तरतुद आहे, परंतु माहिती देण्याविषयी तरतुद नाही. त्याकरिता आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे.

त्यावर तक्रारदाराने आयोगास पुन्हा सुचित केले की, त्यांनी दि.०३.१०.२०२२ रोजी आयोगाकडे व्दितीय अपीलही दाखल केलेले आहे.या सद्य परिस्थितीमध्ये आयोगासमोर प्रथम कलम १८ नुसार तक्रारीमध्ये दंडात्मक कार्यवाही झाल्यानंतर पुन्हा त्याचप्रकरणात व्दितीय अपील चालवून त्यामध्ये माहिती देण्याचे आदेश करणे. हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरुध्द होईल. त्यामुळे वरील नमूद परिस्थितीमध्ये कलम १८ खालील तक्रार अथवा व्दितीय अपील यापैकी कोणत्याही एकाच प्रकरणावर निर्णय दिला जाऊ शकतो. तक्रार ही अधिनियमानुसार अंतिम पायरी आहे.त्यानंतर पुन्हा व्दितीय अपील चालविणे योग्य ठरत नाही.

यावर तक्रारदाराने "माझी सदरची तक्रार रद्द करावी व व्दितीय अपीलावर सुनावणी घ्यावी,"अशी विनंती आयोगास केली आहे. सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अर्जदाराची व्दितीय अपील चालविण्याची विनंती मान्य करुन सदरील तक्रार रद्द करण्यात येत आहे.

**( समीर सहाय )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.७९१ /२०२२/छत्रपती संभाजीनगर/एबीजे/जावक क्र.19407/२०२३ दिनांक : 21/12/2023